# नवी मुंबई महानगरपालिका

## जाहीर आवाहन

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने नवी मुंबई शहरातील तमाम नागरीक / व्यापारी / एजन्सी / कंपनी यांना जाहीर आवाहन करण्यात येत आहे की, महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सार्वजनीक ठिकाणी होर्डींग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व भींतीवर जाहिराती देताना महानगरपालिकेची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच परवानगी संपल्यानंतर सदरच्या जाहिराती तात्काळ काढून घेणे आवश्यक आहे. परंतू शहरामध्ये असे दिसून येते की, सार्वजनीक ठिकाणी अनेक व्यक्ती / संस्था मोठयाप्रमाणात अनधिकृत होर्डींग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व भींतीवर जाहिराती लावून शहराचे विद्रुपीकरण करीत आहेत.

अशा सर्व अनधिकृत होर्डींग्ज, बॅनर्स, पोस्टर्स लावणाऱ्याविरूध्द नियमानुसार फौजदारी कारवाई करण्यासाठी मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.१५५ / २०११ मध्ये आदेश केले आहेत.

तरी कोणीही नागरीक / संस्था / मंडळे / बॅनर्स व भिंती रंगवून जाहिराती करू नयेत, अन्यथा त्यांचेवर सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध कायद्यांतर्गत फौजदारी कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच अशा अनधिकृत जाहिराती / होर्डींग्ज / पोस्टर्स आढळल्यास सुज्ञ व जागृत नागरीकांनी त्याचे छायाचित्रासह संबंधित विभाग अधिकारी यांना email वर अथवा नवी मुंबई महानगरपालिकेच्या (www.nmmconline.com) संकेत स्थळावर किंवा प्रत्यक्ष तक्रार केल्यास आपले शहर स्वच्छ राहण्यास मदत होईल.

**श्री. सागर ज्ञानेश्वर नाईक**
**महापौर, नवी मुंबई**

**डॉ. भास्कर वानखेडे, भा.प्र.से.**
**आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका**